जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

महसूल शाखा

---

**स्मरणपत्र 3**

**जा.क.२०१६/महसूल/टंचाई/कावी-** ५९५ **दिनांकः०४/१०/२०१६**

**पाणी टंचाई / महत्वाचे तात्काळ**

**प्रति,**

**१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर**

**२. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन, जि.का.लातूर**

**विषयः-** लातूर जिल्हयातील पाणी टंचाई निवारणार्थ पुढील नियोजनासाठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करणे.

**संदर्भ -** या कार्यालयाचे पत्र क्रं.२०१६/महसूल/टंचाई/कावि-४७३ दि.०८.०९.२०१६ व दि.२२.०९.२०१६ व दि.२९.०९.२०१६

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, शासन निर्णय दि.०३.०२.१९९९ व शासन निर्णय दि.२१.०८.२००९ नूसार अपूरे पर्जन्यमान किंवा अन्य कारणामुळे ग्रामीण व नागरी क्षेत्रात निर्माण होणा-या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत स्थायी आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत. त्यानूसार पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या उपाययोजना ३० जून पर्यंत राबविण्यात येतात. तथापि यावर्षी काही क्षेत्रामध्ये पर्जन्यमान कमी झाल्यामुळे शासनाने दि.०१.१०.२०१४ च्या परिपत्रकान्वये अशा क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या स्थायी आदेशातील तरतूदीनुसार आतापासूनच तत्परतेने कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने लातूर जिल्हयात या वर्षी अत्यल्प पाऊस झाला असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासन परिपत्रक दि.०१.१०.२०१४ मध्ये नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, व याबाबत आपल्या अधिनस्त सर्व संबंधित यंत्रणांनाही सूचित करावे.

तसेच ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर २०१६ व जानेवारी २०१७ ते मार्च २०१७ व एप्रिल २०१७ जून २०१७ या कालावधीचा मंडळनिहाय पाणी टंचाई कृती आराखडा तयार करुन तात्काळ या कार्यालयास सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सदर अहवाल या कार्यालयास अद्याप अप्राप्त आहे. तरी तात्काळ अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर कामी विलंब टाळावा.

(नारायण उबाळे)

**जिल्हाधिकारी लातूर करिता**

**प्रत - सर्व संबंधीतास आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. आयुक्त महानगरपालिका, लातूर
२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. लातूर
३. गटविकास अधिकारी, पं.स.
   लातूर / औसा / रेणापूर / उदगीर / अहमदपूर / चाकूर / जळकोट / निलंगा / देवणी / शिरुर अनंतपाळ
४. मुख्याधिकारी, नगर पंचायत, औसा / अहमदपूर / निलंगा / उदगीर
५. मुख्याधिकारी, नगर पंचायत, चाकूर / जळकोट / शिरुर अनंतपाळ / देवणी

(नारायण उबाळे)

**जिल्हाधिकारी लातूर करिता**



दु.02382-243234,255204,255205,फॅक्स 02382-242330

संकेतस्थळ- www.latur .nic.in email id revenue.latur @ gmail.com rdc latur @gmail.com

d:\tanchai 2013- 14\tanchai kruti arakhada rural 2014\tanchai kruti arahada letter tippani.docx